विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०१९
नि.क्र.२०/ क (सोबत)

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र.१</u>**

**<u>उलट तपासणी प्रतिवादी क्र.२ तर्फे वकील श्री. एम.व्ही. पाटील यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

दि.२४/१०/२०१९ रोजी गावात जी बैठक झाली त्यामध्ये पंडीत शिंदाळकर, मस्तान शेख व बसवराज चिकटे हे हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, मस्तान शेख व बसवराज चिकटे हे माझ्या गावातले नसून माझ्या पतीचे मित्र आहेत.

**कोर्ट प्रश्न-** तुमच्या गावामध्ये बॉन्ड मिळत असताना तुम्ही निलंगा येथे बॉन्ड घेण्यासाठी का आलात?

**उत्तर-** याबाबत मी काही सांगू शकत नाही.

रु.५,५०,०००/- मध्ये रु.५००/- च्या ११०० नोटा होत्या. सदर रक्कम सोयाबीन विक्री करुन आमच्याकडे आले होते. सोयाबीन विक्रीच्या पावत्या मी दाखल करु शकत नाही. मी प्रतिवादीला खरेदी खत करुन द्यावे म्हणून नोटीस पाठवली नव्हती. प्रतिवादीने १५ दिवसात खरेदीखत करुन द्यायचे ठरले होते. सदर स्टॅम्प प्रतिवादी क्र.१ ने लिहीलेला आहे. सदर स्टॅम्प कोणाकडून घेतला होता हे मला माहिती नाही. खरेदीखत करुन घेण्यासाठी मी व माझा नवरा, प्रतिवादी क्र.१ कडे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, ठरावपत्रावर पंडीत शिंदाळकर यांची सही नाही. साक्षीदार सांगते की, ते ठरावाच्यावेळी हजर होते.

शिरुर अनंतपाळ येथील एका प्लॉटची किंमत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील ठरावपत्र खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ अशोक वेडा असल्यामुळे आम्ही खोटे ठरावपत्र करुन घेतले आहे. आम्ही प्रतिवादी क्र.१ ला जमीन कोणत्या कारणासाठी विक्री करत आहे हे विचारले नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोर्टामध्ये प्रतिवादी क्र.१ ला आम्ही स्वतः हजर करुन त्याचे म्हणणे दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोर्टाकडून एकतर्फा आदेश मिळवण्याकरीता आम्ही सदर दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ठरावपत्राद्वारे जमीन विक्री करण्याची प्रतिवादी क्र.१ ला कोणतीही कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास – संपला. फेरतपास – नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.१३/०८/२०२४

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.